प्रेसनोट ता.२१/१०/२०२२

## दिवाळीसण पार्श्वभुमी अनुषंगाने २ टन भेसळ युक्त खवा पकडुन एफ.डी.ए.ला कारवाईसाठी केले पाचारण हिंजवडी अवैध धंदे पथकाचे पोलीसांची कारवाई...

दिनांक १७/१०/२०२२ रोजी दुपारी पिंपरी चिंचवड परीसरात दिवाळी सणाकरीता स्वीट मार्ट दुकानामधील मधील खव्यापासुन बनवीले जाणारे मिठाईचे विविध पदार्थ् बनवीने करीता आलेला भेसळयुक्त खवा भुमकर चौक ब्रिज येथे येणार आहे अशी माहीती मिळाली.

सदरचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो श्री मुगळीकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अजितकुमार खटाळ ,सहाय्यक पोलीस फौजदार महेश वायबसे, पोहेकॉ/१०४१ संतोष डामसे,पोलीस अमंलदार रवी पवार यांना सदरचा खवा ताब्यात घेऊन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक खटाळ यांनी त्यांचे वरील स्टाफ सह भुमकर चौक हायवे ब्रिज येथे जाऊन सापळा लावुन थांबले असता संशयीत एक पांढ-या रंगाचा टेम्पो क्रमांक एम.एच.१४/एच.यु. ३०३५ यामधुन भेसळयुक्त खवा येत आहे अशी माहीती मिळाली सदर टेम्पो थोळयाच वेळात भुमकर चौक ब्रिज येथे आला सदर टेम्पो ताब्यात घेऊन चौकशी केला असता त्यामधे खव्याचे असलेले विविध बॉक्स व प्लास्टीकचे पॅकींग मिळुन आले सदर टेम्पोचा ड्रायव्हर याचेकडे चौकशी केली असता तो व्यवस्थीत माहीती देत नव्हता त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव अशोक राजाराम चौधरी रा.सांगवी पुणे असे असलेचे सांगीतले सदर टेम्पो मधे असलेला अंदाजे एकुण ५ लाख ९० हजार ४०० रुपये किंमतीचा खवा टेम्पोसह ताब्यात घेवुन सदरचा टेंम्पो व त्यावरील चालक यास अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे यांचे ताब्यात देण्यात आला आहे सदर बाबतचा अधिक तपास अन्न व प्रशासन विभाग पुणे हे करीत आहेत.

सदर बाबत मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो श्री मुगळीकर यांचे मार्गदर्शनाखाली अवैध धंदे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**सदरची कारवाई मा.अंकुश शिंदे सो,पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.डॉ संजय शिंदे सो,अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड,मा.आनंद भोईटे,पोलीस उप आयुक्त परि.२,पिंपरी चिंचवड मा.श्रीकांत डिसले,सहा.पोलीस आयुक्त,वाकड विभाग वाकड,यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,डॉ.विवेक मुगळीकर,सुनिल दहिफळे पोलीस निरीक्षक (गुन्हे),सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक(गुन्हे),अवैध धंदे पथकाचे प्रमुख सपोनि अजितकुमार खटाळ, सहा.पो.फौजदार महेश वायबसे, पोहेकॉ/१०४१ संतोष डामसे,पोहेकॉ/१११७१सराटे पोलीस अमंलदार/२६५९ रवी पवार यांनी केली आहे.**

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त परि-२,
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,